क्र.२/नसवि/महासभा/ ०४ /२०१७-२०१८
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २७ सप्टेंबर २०१७

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०४ /२०१७-२०१८

## महानगरपालिका सभेची नोटीस

---

प्रति,
मा. ------------------------------------------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक ०६/१०/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

27.9.17
**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.०४/०७/२०१७ रोजीची व विशेष सभा दि.२८/०८/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
   अ) दु:खवठ्याचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगपालिका क्षेत्रातील सांगलीवाडी व माधवनगर रोड वरील जकात नाके, सांगली कोल्हापूर रोड वरील कोल्हापूर जकात नाका लिलाव पध्दतीने भाडे तत्वावर देणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दोन विषयपत्रे.**

५. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली बुरुड गल्ली येथील तांबोळी घर ते कर्नाळ चौक या रस्त्यास दख्खनचा काला पहाड कै.पै.व्यंकप्पा बुरुड असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२६/०७/२०१७ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिका क्षेत्रातील विश्रामबाग दत्तनगर, ८० फुटी रोड चौकास जगतज्योती महात्मा बसवाण्णा चौक असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२६/०७/२०१७ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.२५ मधील ख्वॉजा नगर येथील १०० फुटी रोडच्या मेन चौकास नुर ए हुसेन असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०८/०८/२०१७ चे विषयपत्र.**

८. महानगरपालिका क्षेत्रातील पेठभाग हरभट रोड सांगली अर्बन बँक कॉर्नर ते दक्षिणेस नवसंदेश बिल्डींग या दक्षिणोत्तर चालीच्या रस्त्यास आद्यनाटककार विष्णूदास भावेपथ असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०७/०९/२०१७ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिका क्षेत्रातील समतानगर या ठिकाणी रस्ता क्र.९ या चौकास समता चौक असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१३/०९/२०१७ चे विषयपत्र.**

१०. महापालिका मिरज येथील आण्णाबुवा शॉपिंग सेंटर अ बाजू पहिल्या मजल्यावरील खोली क्र.६ चे सहा.संचालक नगररचना यांनी निश्चित केले भाडे र.रु.४६,११९/- मात्र प्रमाणे ९ वर्षे मुदतीने दर तीन वर्षानी २०% भाडेवाढ करणेच्या अटीवर अध्यक्ष,जमियत दर्दमंदाने इन्सानियत,मिरज यांना भाडे तत्वावर देणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३०/०५/२०१६ चे विषयपत्र.**

११. कुपवाड स.नं.३४८/२क, ३४८/१, ३४९/१ व सि.स.नं.२०९१, २०९२, २०९३ या जागेमधून महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार पूर्व-पश्चिम १२.०० मी.रुंद नियोजित रस्त्याची आखणी रद्द करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी **उपायुक्त (नगररचना,कुपवाड) यांचे दि.०७/०९/२०१७ चे विषयपत्र.**

१२. महापालिका मिरज स.नं.१४६/३ पै.शाहू कॉलनी मधील आरक्षण क्र.४२८ हायस्कूल आणि प्ले ग्राऊंड या जमिनीवरील दाखल गुंठेवारी भूखंडाचे नियमितीकरण कामी गुंठेवारी छाननी समिती ठराव क्र.०२ दि.१६/०६/२०१७ अन्वये केलेली शिफारस अवलोकनी घेवून निर्णय घेणेकामी **उपायुक्त (नगररचना,मिरज) यांचे दि.०२/०८/२०१७ चे विषयपत्र.**

१३. महापालिका मिरज वॉर्ड क्र.२६ मधील गुरुवार पेठ सि.स.नं.४८९८ब,४८६८ ब, ४८४५ अ, ४८४५ ब, ४८४६, ४८४८ या जागेवरील आरक्षण क्र.५३६, व्यायामशाळा व सि.स.नं.१३३५,१३३६,१३३७, १३३८,१३३९,१३४० या जागेवरील आ.क्र.५०४ पार्किंग ही आरक्षणे वगळून त्याखालील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ठ करणेबाबतचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये प्रस्ताव मा.शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस निर्णयार्थ **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२६/०९/२०१७ चे विषयपत्र.**

१४. महापालिका आमराई उद्यानातील जळावू लाकूड, सांगलीवाडी येथील चिंच झाडाचा बुंधा व समाधी स्थळावरील लाकूड साहित्याचा जाहिर लिलाव करणेकामी ई-टेंडरद्वारे जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त तीन निविदा पैकी सर्वात जादा दराचे निविदाधारक श्री.मुस्तफा गुलाम मुश्रीफ,मिरज यांचे र.रु.२,०१,०००/- मात्र लिलाव रक्कमेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (बांधकाम (उद्यान) विभाग) यांचे दि.०७/०९/२०१७ चे विषयपत्र.**

.. ३ ...

१५. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पाणी पुरवठा विभाग,सांगली कडील सिनियर पाईप इन्स्पेक्टर या पदावरील कायम कर्मचारी श्री.अशोक पांडूरंग देवकुळे यांचेवर कर्करोग या आजारावर एकूण र.रु.१,२९,६२२/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, श्री.देवकुळे यांनी वैद्यकीय परिपुर्तीची रक्कम मागणी केली आहे. पैकी ९०% र.रु.१,१६,६६०/- मात्र वैद्यकिय परिपूर्तीची रक्कम आदा करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२७/०७/२०१७ चे विषयपत्र.**

१६. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील जकात विभाग,मिरज कडील शिपाई या पदावरील कायम कर्मचारी श्री.चंद्रकांत महादेव भोरे यांचेवर अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया करणेत आली असून, त्यासाठी एकूण र.रु.१,२९,५०५/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, श्री.भोरे यांनी वैद्यकीय परिपुर्तीची रक्कम मागणी केली आहे. पैकी ९०% र.रु.१,१६,५५४/- मात्र वैद्यकिय परिपूर्तीची रक्कम आदा करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२७/०७/२०१७ चे विषयपत्र.**

१७. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील जकात विभाग,सांगली कडील कनिष्ठ लिपीक या पदावरील कायम कर्मचारी श्री.संदीप सुमतीलाल शहा यांचेवर डोक्यामध्ये असह्य वेदना होवून चक्कर मारणे यावर करणेत आलेल्या उपचारासाठी एकूण र.रु.१,०६,९०२/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, श्री.शहा यांनी वैद्यकीय परिपुर्तीची रक्कम मागणी केली आहे. पैकी ९०% र.रु.९६,९१२/- मात्र वैद्यकिय परिपूर्तीची रक्कम आदा करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२७/०७/२०१७ चे विषयपत्र.**

१८. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० चे अंमलबजावणी करीता मा.स्थायी समिती ठराव क्र.२०८ दि.०९/१२/२०१६ अवये निविदा दराने सेवाशुल्क देणेस व अंतिम DPR मा.महासभेच्या मान्यतेसाठी सादर करणेस शिफारस केलेनुसार सदर DPR ला मान्यता मिळणेस व सदर DPR हा नगरविकास मंत्रालयाकडे सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना किंवा स्वच्छ महाराष्ट्र अभियान किंवा स्वच्छ भारत मिशन योजनेंतर्गत किंवा राज्य व केंद्र शासनाकडील इतर प्राप्त योजनेंतर्गत अनुदान मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२९/११/२०१६ चे विषयपत्र. (प्रस्तुतचा विषय दि.०४/०२/२०१७ रोजीच्या विशेष सभेने व दि.२०/०५/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेने प्रलंबित ठेवणेत** आलेला आहे.)

१९. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

२०. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयाना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

27.9.17

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०४/२०१७-१८

## महापालिका सभा दिनांक ०६/१०/२०१७ करीता.

शुक्रवार दि.०६/१०/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

**१. मा.विष्णु आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव:-**

महानगरपालिका क्षेत्रातील शामनगर,अष्टविनायक नगर,शाहूनगर या परिसरात बाजाराची सोय नसल्याने, मल्हारराव होळकर चौक शामनगर येथील शांतीनगरकडे जाणाऱ्या ८० फुटी डी.पी.रस्त्यावर आठवडा बाजार प्रत्येक रविवारी सुरु करणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

**२. मा.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका मिरज शहरातील वॉर्ड क्र.२६ मधील पिरनालसाब चौक येथे आयलँड आहे त्यामध्ये तेथील नागरीक केरकचरा टाकत आहेत तसेच, पावसाचे पाणी साचून दुर्गंधी पसरलेली आहे व आयलँड येथे नागरिक वाहन लावून रस्त्यावर वाहतुकीस अडथळा करीत आहेत. यासाठी सदरचे आयलँड तात्काळ हटविणे करीता निर्णय घेवून मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

**३. मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महापालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.१६ मधील माता रमाई आंबेडकर उद्याना समोरील (सि.स.नं.२६७/१+२ब) चौकास क्रांतिवीर डॉ.नागनाथ आण्णा नायकवडी असे नामकरण करणेस तसेच, मनपा किंवा खाजगी संस्था/व्यक्ती यांच्या माध्यमातून चौकाचे सुशोभिकरण करणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

**४. मा.पै.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.३८ मधील संघर्ष व्यायाम मंडळ मागील आणि वसंतदादा क्रिडा मंडळ येथील असलेले जुने शौचालय नादुरुस्त व विनावापर बंद असल्याने परिसरात दुर्गंधी परसत आहे. त्यामुळे सदर दोन्ही ठिकाणचे शौचालय पाडणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

**५. मा.युवराज शिवाजीराव गायकवाड यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ४ करीता दोन शाखा अभियंता व सार्व.बांधकाम मुख्यालयासाठी दोन शाखा अभियंता मानधनावर घेणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

**६. मा.युवराज शिवाजीराव गायकवाड यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिकेच्या मालमत्ता कराच्या (घरपट्टी) बिलामध्ये वार्षिक पाणी बिलाची र.रु.२०००/- प्रमाणे आकारणी करुन वर्षातून दोन वेळा एकत्रित बिल वाटप करुन व पाणी पुरवठा व मालमत्ता कर (घरपट्टी) ची स्वतंत्र कर्मचाऱ्यांची पथके नेमूण वसुली करणेची पद्धत राबविणेकामी विचारार्थ व निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

**७. मा.शिवाजी बाबूराव दुर्वे यांनी दिलेला प्रस्ताव:-**

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज वॉर्ड क्र.१२ मंगळवार पेठ परिट गल्ली येथील धोकादायक शौचालय पाडणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

**८. मा.सुरेश देवाप्पा आवटी यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका मिरज शहरातील वॉर्ड क्र.९ येथील जिजामाता गोसावी गल्ली येथील धोकादायक शौचालय पाडणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

**९. मा.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महापालिका क्षेत्रातील गुंठेवारी परिसरातील नागरीकांचे कडून नियमितीकरण करणेसाठीचे प्रस्ताव दाखल झालेले असून, त्यासाठी असणारी गुंठेवारी नियमितीकरणासाठीची मुदत संपलेली असल्याने, नागरीकांचेकडून मागणी होत आहे. यासाठी गुंठेवारी नियमितीकरण करणेसाठी दि.३१ मार्च २०१८ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

---

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : ०४/१०/२०१७.

**महापालिका सचिव,**
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ५३

विषय क्रमांक :- ०१

---

मागील सर्वसाधारण सभा दि.०४/०७/२०१७ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.३० ते ठराव क्र.४३ हे आणि विशेष सभा दि.२८/०८/२०१७ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.४४ ते ठराव क्र.५२ हे सभागृहा मध्ये वाचन सुरु असताना, सभागृहातील उपस्थित सदस्य मा.किशोर दादासो जामदार यांनी दिले सूचनेनुसार दि.२८/०८/२०१७ रोजीच्या सभेने पारित केलेला ठराव क्र.५० अन्वये स.नं.५०७ मधील करावयाच्या भूसंपादन करणेस मान्यता देणेत आलेली आहे. सदर ठरावांमध्ये स.नं.५०७ मधील करावयाच्या भूसंपादन जागेमध्ये ख्रिश्चन कंम्युनिटी असोशिएशन,सांगली यांनी ख्रिश्चन समाजाच्या कब्रस्तानसाठी जागा मिळणेची मागणी केलेनुसार स.नं.५०७ मधील करावयाच्या एकुण सहा एकर भूसंपादन जागेपैकी दीड एकर जागा ख्रिश्चन (ख्रिस्ती) समाजाच्या कब्रस्तानसाठी तसेच, उर्वरित जागा मुस्लिम दफनभूमीसाठी देणेस ही सभा मान्यता देत असून, उर्वरित सभेचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर,

१) मा.महासभा लिपिक

२) सहा.संचालक (नगररचना) (३) मालमत्ता व्यवस्थापक

[signature]

महापालिका सचिव,

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ५४

विषय क्रमांक :- ०२

---

## दु:खवट्याचा ठराव

माजी नगरसेविका भारती भगत यांचे वडील सुधारकरावजी बळकंठे यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या झालेल्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.विष्णू आण्णासाहेब माने

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

अनुमोदक :- मा.शेडजी सुबराव मोहिते

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ५५

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे नगरसेवक मा.धनपाल तात्या खोंत यांचे पुतणे बाळासाहेब सुरेंद्र अपराध यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या झालेल्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.सुरेश देवाप्पा आवटी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- मा.राजेश विठ्ठल नाईक

पुरवठादार अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ५६

विषय क्रमांक :- ०२

---

## दु:खवटयाचा ठराव

तत्कालीन मिरज नगरपालिकेचे माजी नगरसेवक राजू सरवदे यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या झालेल्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.सुरेश देवाप्पा आवटी

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.शिवाजी बाबूराव दुर्वे

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ५७

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवट्याचा ठराव

एल फिलटन्स ब्रीज मुंबई परेल येथील रेल्वे ब्रिज वरील झालेल्या दुर्घनेमध्ये २३ नागरीकांचा आकस्मित दुर्देवी अपघाती (चेंगरा चेंगरीमध्ये) मृत्यू पावलेल्या नागरीकांच्या कुटुंबाच्या झालेल्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.गौतम संभाजी पवार

अनुमोदक :- मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ५८

विषय क्रमांक :- ०२

---

## अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे नगरसेवक श्री.संजय मेंढे यांची राष्ट्रीय काँग्रेस मिरज शहर अध्यक्षपदी निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने श्री.संजय मेंढे यांचे ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान

अनुमोदक :- मा.शिवाजी बाबूराव दुर्वे

ठराव सर्वानुमते,मंजुर

महापौर,

पुराणकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ५९

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

सर्वोदय सहकारी साखर कारखान्यामध्ये नुकत्याच झालेल्या निवडणूकात मा.प.पृथ्वीराज संभाजी पवार यांचे नेतृत्वाखाली पॅनेल बिनविरोध निवडून आल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने मा.पै.पृथ्वीराज संभाजी पवार व नवनिर्वाचित संचालक मंडळाचे ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.शिवराज श्रीशैल्य बोळाज

अनुमोदक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ६०

विषय क्रमांक :- ०२

---

## अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्र हागणदारी मुक्त झालेले आहे. याची दखल भारत सरकारने घेवून, सांगली जिल्ह्याचा उचित गौरव दिल्ली दरबारी केलेला आहे. याचा रास्त अभिमान सांगलीकर म्हणून आम्हास आहे. हागणदारी मुक्त महापालिका क्षेत्र करण्यासाठी मा.महापौर व इतर पदाधिकारी तसेच, मा.आयुक्त,उपायुक्त,आरोग्याधिकारी विशेषत: सफाई स्त्री/पुरुष कामगार यांचे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
महापौर.

अनुमोदक :- मा.गौतम संभाजी पवार

प्रशासकीय अधिकारी

(सही)
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ६१

विषय क्रमांक :- ०२

---

## अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये पाणी पुरवठा विभागातील कार्यकारी अभियंता श्री.शितल उपाध्ये यांनी UISSMT योजनेतून

१. माळबंगला येथे अत्याधुनिक ७० द.लक्ष क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र बांधणे.

२. समतानगर येथे १५ लक्ष लिटर क्षमतेचे उंच टाकी बांधणे.

३. संजयनगर येथे वितरण व्यवस्था करणे.

४.कोल्हापूर रोड येथे १५ लक्ष लिटर क्षमतेचे उंच टाकी बांधणे व वितरण नलिका टाकणे.

५.कंम्पौंड वॉल बांधणे,सांगलीवाडी येथे १५ लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे.

६.शामरावनगर येथे वितरण नलिका टाकणे व कंम्पौंड वॉल बांधणे.

वरील योजना यशस्वीपणे राबवून महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पाणी पुरवठा सुरळीत केल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा यांचे ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा. जगन्नाथ बापू ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

अनुमोदक :- मा.गौतम संभाजी पवार

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- 82

विषय क्रमांक :- ०२

---

## अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये नुकत्याच झालेल्या गणेश उत्सव काळामध्ये गणेश विसर्जनच्या काळात महापालिकेतील मा.आयुक्त, मा.वैद्यकिय आरोग्याधिकारी,स्वच्छता निरिक्षक,मुकादम,सफाई कर्मचारी यांनी स्वच्छता मोहिम चांगल्या प्रकारे राबविल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या (वतीने) त्यांचे ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.शिवराज श्रीशैल्य बोळाज

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ६३

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

जेष्ठ पत्रकार श्री.संपत बर्गे यांच्या मुली श्वेता बर्गे यांची ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटी लंडन व तन्वी बर्गे यांची रॉयल हाल्वे युनिर्व्हसिटी ऑफ लंडन मध्ये निवड झाली आहे. त्या लंडनला रवाना झाल्या आहेत.

श्वेता बर्गे यांचा मॉडर्न साऊथ एशिया हा अभ्यासांचा विषय आहे तर तन्वी बर्गे यांचा सायबर सिक्युरिटी हा विषय आहे. एका वेळी दोघी उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या पहिल्या बहिणी असाव्यात.

श्वेता बर्गेयांचे प्राथमिक शिक्षण बापट बाल मंदिर,ग.रा.पुरोहित कन्याशाळा,महाविद्यालयीन श्रीमती कस्तुरबा वालचंद महाविद्यालय सांगली येथे तर, टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस् मुंबई येथे एम.एस.डब्ल्यु नेट परिक्षा पास बेस्ट स्टुडंट फॉर परफॉरमन्स्, दिड महिन्यासाठी युटा युनिर्व्हसिटीमध्ये निवड, नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया मध्ये सी.एस.आर.मॅनेजर म्हणून काम.

तन्वी बर्गे यांचे शालेय शिक्षण सांगलीत B.E. (IT) M.A. (मेडिया कल्चर टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स,मुंबई), M.A. अशोका युनिर्व्हसिटी दिल्ली, युनेस्को इंटरनॅशनल सेमिनारमध्ये सहभाग पॅरिस या त्यांच्या यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने श्वेता बर्गे व तन्वी बर्गे यांचे ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.विष्णू आण्णासाहिब माने

अनुमोदक :- मा.संतोष शिवदास पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ६४

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

सांगली जिल्ह्याची सूकन्या कुमारी स्मृती मानधना यांनी जागतिक महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये भारतीय संघात उल्लेखनिय कामगिरी करुन सांगली जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने सुकन्या कुमारी स्मृती मानधना यांचे ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ ठोकळे

अनुमोदक :- मा.शिवराज बोळाज

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ६५

विषय क्रमांक :- सूचना

---

सोबतचे श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेली सूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका सर्वसाधारण सभा दि.०६/१०/२०१७ रोजी नियोजित वेळेत सुरु होवून, त्यामधील विषय क्र. १ व २ मंजूर करणेत आले. त्यानंतर विषय क्र.३ चे वाचन सुरु होताच श्री.संतोष पाटील यांनी माळबंगला अहवाल वाचन करणेविषयी मा.महापौर यांना विनंती केली. त्यानुसार मा.महापौर यांनी सहा.संचालक नगररचनाकार यांना माळबंगला अहवालाची माहिती देणेचे आदेश दिले. तद्नंतर सहा.संचालक नगररचनाकार यांनी माळबंगला अहवाल ८०% अहवाल तयार असलेचे सांगितलेवरुन श्री.संतोष पाटील व सभागृहातील उपस्थित अन्य सदस्यांनी परिपूर्ण अहवाल सादर केलेशिवाय या पुढील सभा कामकाज होवू देणार नसलेचे विदीत केलेनुसार सभागृहातील सदस्यांच्या भावना विचारात घेता, मा.महापौरसो यांनी माळबंगला अहवाल परिपूर्ण सादर करणेचे निर्देश देवून, सदरचा परिपूर्ण अहवाल सादर करणेसाठी सदरची सभा सोमवार दि.०९/१०/२०१७ रोजी सकाळी ११.३० पर्यंत तहकूब करणेत येत असलेचे जाहिर केले.

महापालिका सर्वसाधारण सभा दि.०९/१०/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता दि.०६/ १०/२०१७ रोजीच्या सभेच्या कार्यक्रम पत्रिकेवरील उर्वरित सभा कामकाज सुरुवात करणेपूर्वी माळबंगला अहवालाचे वाचन करणेविषयी श्री.संतोष पाटील यांनी मागणी केली. त्यावर सभागृहाला माहिती देणेविषयी मा.महापौर यांनी सहा.संचालक नगररचनाकार यांना आदेश दिलेनुसार त्यांनी सभागृहामध्ये सादर केलेल्या माहितीमध्ये अहवाल अपुरा असलेचे सांगणेत आले. त्यावर सन्मा.सदस्य संतोष पाटील व विरोधी पक्षनेता श्री.शेडजी मोहिते यांनी, पूर्वी स.नं.१८०/१,१८०/२,२०२/१,२०२/२ हा रद्द होवून सन १९८४ पासून सि.स.नं.३३०२ असा होवून, तत्कालीन सांगली नगरपरिषदेच्या नावाने मिळकत उतारा (प्रॉपर्टी कार्ड) निघत असून, सदर जागेचे क्षेत्र ३.८५ हेक्टर असलेचे सांगितले तसेच, सन २०१३ मध्ये जागा खरेदी करत असताना, रद्द झालेल्या ७/१२ उताऱ्यावर व तोही बनावट उताऱ्यानुसार खरेदी केले असलेचे सभागृहाच्या निर्दशनास आणले. तसेच सन २०१३ पूर्वी सन २००८ मध्ये सदर जमिनीपैकी काही हिस्सा श्री राजेश गंगवाणी व श्री शेखर माने यांचे नावे विकसन करारपत्र करुन दिलेले सभागृहाच्या निर्दशास आणले. त्यामुळे सदर बेकायदेशीर खरेदी कामी तत्कालीन आयुक्त, उपायुक्त,सहा.संचालक नगररचना व संबंधीत सर्व अधिकारी तसेच, जमिन मालक म्हणून वियजसिंह राजे पटवर्धन व श्री गंगवाणी व श्री शेखर माने यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करणेची मागणी केली. तसेच, याकामी महापालिका पॅनेल वरील वकीलांनी जागेचे टायटल सर्च घेणे आवश्यक असताना ते न घेता, जागा मालकीची कोणतीही खात्री न करता निव्वळ जागा मालकाचे प्रशासनाशी संगनमताने होणाऱ्या खरेदी कामी अभिप्राय दिला असलेने, त्या भ्रष्टाचारामध्ये त्यांचाही सहभाग असलेचे प्रथम दर्शनी स्पष्ट होत आहे.

...२...

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ६६

विषय क्रमांक :- ०४

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दोन विषयपत्रे या सभेने अवलोकनी घेतले.

महानगपालिका क्षेत्रातील सांगलीवाडी व माधवनगर रोड वरील ज़कात नाके, सांगली कोल्हापूर रोड वरील कोल्हापूर जकात नाका लिलाव पध्दतीने भाडे तत्वावर देणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली चर्चेअती महापालिका मालकीचे जे काही जकात नाके आहेत. त्या सर्व जकात नाक्यांचा एकत्रित प्रस्ताव सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत असून, असे सर्व एकत्रित प्रस्ताव सादर करेपर्यंत प्रस्तुतचा प्रस्ताव ही सभा तुर्त प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक (नगरसेविका स्वाक्षरी)
(लो. दुरेखा कांबळे)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (स्वाक्षरी)

(स्वाक्षरी)
महापौर.

महासभा व्यवस्थापक

(स्वाक्षरी)
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ६७

विषय क्रमांक :- ०५

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२६/०७/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली बुरुड गल्ली-येथील तांबोळी घर ते कर्नाळ चौक या रस्त्यास दख्खनचा काला पहाड के.पै.व्यंकाप्पा बुरुड असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Shinde

अनुमोदक :- S Bandgar

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नाथेमना व्यवस्थापक,

महापालिका सचिव.
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ६८

विषय क्रमांक :- ०६

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२६/०७/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील विश्रामबाग दत्तनगर, ८० फुटी रोड चौकास जगतज्योती महात्मा बसवाण्णा चौक असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक (का. सुरेश गायकवाड)

अनुमोदक (डॉ. सुरेखा कोथळे)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ६९

विषय क्रमांक :- ०७

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दिं.०८/०८/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.२५ मधील ख्वॉजा नगर येथील १०० फुटी रोडच्या मेन चौकास नुर ए हुसेन असे नामकरण करणेस महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत कोणत्याही प्रकारच्या सूचना व हरकती प्राप्त न झालेने, महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.२५ मधील ख्वॉजा नगर येथील १०० फुटी रोडच्या मेन चौकास नुर ए हुसेन असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature] (डॉ. कुरेशा कोयर)

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

[signature]
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ७०

विषय क्रमांक :- ०८

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०७/०९/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील पेठभाग हरभट रोड सांगली अर्बन बँक कॉर्नर ते दक्षिणेस नवसंदेश बिल्डींग या दक्षिणोत्तर चालीच्या रस्त्यास आद्यनाटककार विष्णूदास भावेपथ असे नामकरण करणेस महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत कोणत्याही प्रकारच्या सूचना व हरकती प्राप्त न झालेने, महापालिका क्षेत्रातील पेठभाग हरभट रोड सांगली अर्बन बँक कॉर्नर ते दक्षिणेस नवसंदेश बिल्डींग या दक्षिणोत्तर चालीच्या रस्त्यास आद्यनाटककार विष्णूदास भावेपथ असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]
सौ. सुरेखा कांबळे

ठराव सर्वानुमते मंजुर
[signature]
महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

[signature]
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७

०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ७१

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१३/०९/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील समतानगर या ठिकाणी रस्ता क्र.१ या चौकास समता चौक असे नामकरण करणेस महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत कोणत्याही प्रकारच्या सूचना व हरकती प्राप्त न झालेने, महापालिका क्षेत्रातील समतानगर या ठिकाणी रस्ता क्र.१ या चौकास समता चौक असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :- सौ. सुरेखा कांबळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- 02

विषय क्रमांक :- १०

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३०/०५/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका मिरज येथील आण्णाबुवा शॉपिंग सेंटर अ बाजू पहिल्या मजल्यावरील खोली क्र.६ चे सहा.संचालक नगररचना यांनी निश्चित केले भाडे र.रु.४६,११९/- मात्र प्रमाणे ९ वर्षे मुदतीने दर तीन वर्षानी २०% भाडेवाढ करणेच्या अटीवर अध्यक्ष,जमियत दर्दमंदाने इन्सानियत,मिरज यांना भाडे तत्वावर देणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रस्तुत कामी प्रशासनाने जाहिर लिलाव काढून, लिलाव प्रक्रिया राबविणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :- सौ. सुरेखा कांबळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ — दिनांक :- ०६/१०/२०१७, ०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ७३

विषय क्रमांक :- ११

---

सोबतचे उपायुक्त (नगररचना,कुपवाड) यांचे दि.०७/०९/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

कुपवाड स.नं.३४८/२क, ३४८/१, ३४९/१ व सि.स.नं.२०९१, २०९२, २०९३ या जागेमधून महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार पूर्व-पश्चिम १२.०० मी.रुंद नियोजित रस्त्याची आखणी रद्द करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस तेथील नागरीक श्री.विजय विठ्ठल निकम व इतर ५८ यांनी दि.०१/०२/२०१७ रोजी अर्ज केलेला आहे.

सदर नियोजित १२.००मी.रस्ता हा एस.टी.कॉलनी ते बुधगाव हद्दीमध्ये जाणारा ३०.४८मी. रस्ता ते आंबा चौक ते अहिल्यानगर चौक पर्यंत जाणारा १८.०० मी.रस्त्यास जोडणारा रस्ता असून, प्रत्यक्ष जागेवर सदर १२.०० मी.रुंद रस्त्यास समांतर स.नं.३४९ मध्ये ९.००मी.रस्ता आहे. सदर १२.००मी.रस्ता अंमलात आणल्यास, विद्यमान रस्ता व विकास योजनेतील रस्ता असे दोन छेदणारे अनावश्यक रस्ते निर्माण होतील. सदर ठिकाणी विद्यमान रस्ता असल्याने विकास योजनेतील १२.००मी.रस्ता असणेची आवश्यकता नाही. तसेच, सदर जागेवर विद्यमान बांधकामेही विकास योजना मंजूर होणे पूर्वीची असल्याने, सदर जागेमध्ये नियोजित १२.००मी रस्त्याची अंमलबजावणी होणे अडचणीचे आहे ही वस्तुस्थिती विचारात घेता, सदर प्रस्तावित १२.००मी. रस्ता रद्द करणे उचित होईल असे या सभेचे मत आहे.

सबब, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, सदर जागेवर असलेली विद्यमान बांधकामे ही विकास योजना मंजूर होणे पूर्वीची असल्याने, महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार एस.टी.कॉलनी (रामकृष्णनगर) ते बुधगाव हद्दीपर्यंत जाणारा ३०.४८ मी.रस्ता व आंबा चौक ते अहिल्यानगर चौक पर्यंत जाणारा १८.०० मी. रस्त्यास जोडणारा स.नं.३४८/२क, ३४८/१, ३४९/१ व सि.स.नं.२०९१,२०९२,२०९३ या जागेमधून जाणारा पूर्व-पश्चिम १२.००मी. रुंदीचा रस्ता रद्द करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेसाठी एक महिन्याच्या मुदतीत सूचना हरकती मागविणेस तसेच, सदरचा प्रस्ताव मा.शासनास मान्यतेसाठी सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. दरम्यानच्या कालावधीत शासन मान्यतेच्या अधीन राहून तात्काळ उपरोक्त रस्त्यावरील गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव मान्य करुन, संबंधीतांना प्रमाणपत्र वितरीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा. धनपाल खोत)

अनुमोदक :- (मा. संतोष पाटील)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सहा. सेवा४६ (न.र.)

महापालिका सचिव

मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४**

दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ७४

विषय क्रमांक :- १२

---

सोबतचे उपायुक्त (नगररचना,मिरज) यांचे दि.०२/०८/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका मिरज स.न.१४६/३ प.शाहू कालनी मधील आरक्षण क्र.४२८ हायस्कूल आणि प्ले ग्राऊंड या जमिनीवरील दाखल गुंठेवारी भूखंडाचे नियमितीकरण कामी गुंठेवारी छाननी समिती ठराव क्र.०२ दि.१६/०६/२०१७ अन्वये केलेली शिफारस अवलोकनी घेवून निर्णय घेणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होवून, झाले चर्चेनुसार प्रस्तुतचा विषय ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ७५

विषय क्रमांक :- १३

---

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२६/०९/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका मिरज वॉर्ड क्र.२६ मधील गुरुवार पेठ सि.स.नं.४८९८ब,४८६८ ब, ४८४५ अ, ४८४५ ब, ४८४६, ४८४८ या जागेवरील आरक्षण क्र.५३६, व्यायामशाळा व सि.स.नं.१३३५,१३३६,१३३७,१३३८,१३३९,१३४० या जागेवरील आ.क्र.५०४ पार्किंग व रस्त्याचे आरक्षणे वगळून त्याखालील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ठ करणेस तेथील सन्मा.सदस्य व नागरीकांनी मागणी केलेनुसार उपरोक्त ठिकाणच्या आरक्षण बदलाबाबत महासभा ठराव क्र.९० दि.०१/०९/२०१६ अन्वये दिले मान्यतेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करुन एक महिना मुदतीच्या सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत कोणत्याही प्रकारच्या सूचना/ हरकती प्राप्त न झाल्याने, उपरोक्त ठिकाणची आरक्षणे रस्त्यासह रद्द करणेस व त्याखालील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ठ करणेस तसेच, सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक

महापौर

सहाय्यक संचालक (नगररचना)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ७९

विषय क्रमांक :- १४

---

सोबतचे उपायुक्त (बांधकाम (उद्यान) विभाग) यांचे दि.०७/०९/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका आमराई उद्यानातील जळावू लाकूड, सांगलीवाडी येथील चिंच झाडाचा बुंधा व समाधी स्थळावरील लाकूड साहित्याचा-जाहिर लिलाव करणेकामी ई-टेंडरद्वारे जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त तीन निविदा पैकी सर्वात जादा दराचे निविदाधारक श्री.मुस्तफा गुलाम मुश्रीफ,मिरज यांचे र.रु.२,०१,०००/- मात्र लिलाव रक्कमेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- सौ.सुरेखा कांबळे

अनुमोदक :- श्री.युवराज गायकवाड

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

शहर अभियंता (उद्याने)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ७७

विषय क्रमांक :- १५

---

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२७/०७/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पाणी पुरवठा विभाग,सांगली कडील सिनियर पाईप इन्स्पेक्टर या पदावरील कायम कर्मचारी श्री.अशोक पांडूरंग देवकुळे यांचेवर कर्करोग या आजारावर एकूण र.रु.१,२९,६२२/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, श्री.देवकुळे यांनी वैद्यकीय परिपुर्तीची रक्कम मागणी केली आहे. पैकी ९०% र.रु.१,१६,६६०/- मात्र वैद्यकिय परिपूर्तीची रक्कम आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (लो. सुरेखा कांबळे)

अनुमोदक :- (मा. युवराज गायकवाड)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

प्रशासन अधि. (काय्या.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ | दिनांक :- ०६/१०/२०१७ ०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ७८

विषय क्रमांक :- १६

---

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२७/०७/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील जकात विभाग,मिरज कडील शिपाई या पदावरील कायम कर्मचारी श्री.चंद्रकांत महादेव भोरे यांचेवर अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया करणेत आली असून, त्यासाठी एकूण र.रु.१,२९,५०५/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, श्री.भोरे यांनी वैद्यकीय परिपुर्तीची रक्कम मागणी केली आहे. पैकी ९०% र.रु.१,१६,५५४/- मात्र वैद्यकिय परिपूर्तीची रक्कम आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (सही)

अनुमोदक :- सौ. वं.स. कदम.

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)

महापौर,

प्रशासन अधि. (आस्था.)

(सही)

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ७९

विषय क्रमांक :- १७-

---

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२७/०७/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील जकात विभाग,सांगली कडील कनिष्ठ लिपीक या पदावरील कायम कर्मचारी श्री.संदीप सुमतीलाल शहा यांचेवर डोक्यामध्ये असह्य वेदना होवून चक्कर मारणे यावर करणेत आलेल्या उपचारासाठी एकूण र.रु.१,०६,९०२/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, श्री.शहा यांनी वैद्यकीय परिपुर्तीची रक्कम मागणी केली आहे. पैकी ९०% र.रु.९६,९१२/- मात्र वैद्यकिय परिपूर्तीची रक्कम आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक - (सौ. दुरेखा कांबळे)

अनुमोदक - (मा. युवराज गायकवाड)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासन अधि. (कार्या.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ — दिनांक :- ०६/१०/२०१७ ०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ८०

विषय क्रमांक :- १८

---

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२९/११/२०१६ चे विषयपत्र (प्रस्तुतचा विषय दि.०४/०२/२०१७ रोजीच्या विशेष सभेने व दि.२०/०५/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेने प्रलंबित ठेवणेत आलेला आहे.) या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० चे अंमलबजावणी करीता मा.स्थायी समिती ठराव क्र.२०८ दि.०९/१२/२०१६ अन्वये निविदा दराने सेवाशुल्क देणेस व अंतिम DPR मा.महासभेच्या मान्यतेसाठी सादर करणेस शिफारस केलेनुसार सदर DPR ला मान्यता मिळणेस व सदर DPR हा नगरविकास मंत्रालयाकडे सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना किंवा स्वच्छ महाराष्ट्र अभियान किंवा स्वच्छ भारत मिशन योजनेंतर्गत किंवा राज्य व केंद्र शासनाकडील इतर प्राप्त योजनेंतर्गत अनुदान मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेकामी आलेल्या विषयपत्रावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

विषयांकीत प्रकरणी इको सेव्ह कंपनीने DPR तयार केलेला असून, त्यामधील कंपनीने सुचविलेले नऊ मुद्दयांवर चर्चा करणेत येवून, त्यामधील खालील प्रमुख बाबींवर विचार-विनीमय करणेत आला.

१. घरोघरी कचरा गोळा करणे व संकलन
२. गोळा करुन कंटेनरपर्यंत वाहतुक करणे
३. कचरा डेपोपर्यंत वाहतुक करणे (वाहनामार्फत)
४. कचरा प्रक्रिया करणे आणि शास्त्रोक्त पद्धतीने कचरा भूमी भरण करणे
५. सदरच्या डेपोवर साठलेल्या कचऱ्याचे बायोरेमिडीएशन करणे
६. सदरच्या येणाऱ्या कचऱ्यावर प्रोसेसिंग प्लॅन्ट पुर्ण होईपर्यंत मधील काळामध्ये दुर्गंधी व कचरा कुजण्याकामी औषध फवारणी करणे आणि इतर मध्ये IEC चे कामकाज करीत राहणे.
७. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे व संबंधीत साधणे इ.बाबींचा DPR मध्ये अंतर्भाव आहे.

... २ ...

उपरोक्त बाबींसह प्रस्तुत DPR वर खालीलप्रमाणे सूचना सभागृहामध्ये उपस्थित करणेत आल्या.

१. सदर DPR नुसार टेंडर प्रक्रिया करत असताना त्यावर प्रशासनाकडून शासनमान्य तांत्रिक सल्लागार नियुक्त करणेत यावा.

२. सदर DPR नुसार टेंडर प्रक्रिया राबवणेपूर्वी DPR मध्ये समाविष्ट टेक्नॉलॉजी (तंत्रज्ञान ) ऐवजी जर का नविन किफायतशीर तंत्रज्ञान अवलंबता येऊ शकते असे जर का एखादया सदस्याचे , नागरिकाचे, एन्जीओचे, मत झाले व त्यांनी ते उच्च स्तरीय सनियंत्रण समिती समोर मांडून पटवून दिले तर सदर तंत्रज्ञानाचा समावेश अमंलबजावणी प्रक्रियेमध्ये करण्याच्या अटीवर सदर DPR ला ही सभा मान्यता देत आहे.

३. घनकचरा व्यवस्थापनेच्या विविध प्रकल्पांबाबत आत्मविश्वास येणेसाठी विविध शहरातील प्रकल्पांची पहाणी करण्यात आली . तसेच घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेत निधीचा योग्यप्रकारे वापर होऊन नागरिकांच्या पैशाचा अपव्यय होऊ नये व सदर DPR मधील प्रकल्प कायमस्वरुपी सुरु रहावा. यासाठी विविध ठिकाणी काढण्यात आलेल्या अभ्यासदौ-यामध्ये काही कालावधी लागल्याने जो विलंब झाला आहे त्याचा विचार करता मा. हरित न्यायालयाकडे प्रसंगी शासनाकडे रिव्हीजन दाखल करुन अमंलबजावणीस प्रशासनाने मुदतवाढ मागवून घ्यावी. त्यासाठी योग्य ती कार्यपध्दती अवलंबून प्रस्ताव तात्काळ सादर करणेत यावा.

४. मा. हरित न्यायालय यांच्या निर्देशानुसार दिर्घकालीन व अल्पकालीन घनकचरा व्यवस्थापनाचा अवलंब करण्यास व समडोळी कचरा डेपो, तसेच बेडग कचरा डेपो येथील साचलेल्या कच-याचे निर्मुलन करण्यासाठी आवश्यक त्या सर्व बाबी व तंत्रज्ञान वापर करणेसाठी ही सभा आदेशित करणेत येत आहे.

उपरोक्त सूचना व अटीसह सदरचा DPR ला ही सभा मान्यता देत असून, तो नगरविकास मंत्रालयाकडे सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना किंवा स्वच्छ महाराष्ट्र अभियान किंवा स्वच्छ भारत मिशन अंतर्गत किंवा राज्य व केंद्र शासनाकडील इतर प्राप्त योजनेंतर्गत अनुदान मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक : (मा. किशोर जामदार)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा. प्रशांत पाटील)

महापौर,

आरोग्याधिकारी,
प्रस्तुत ठराव, मा. आयुक्त यांचे निदर्शनास आणून कार्यवाही करावी.

महापालिका सचिव

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ८१

विषय क्रमांक :- १९

---

सोबतचे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय,मुंबई यांचे दि.१२/०९/२०१७ चे निदेश या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेची विशेष महासभा दि.२८/०८/२०१७ रोजीच्या सभेमध्ये ठराव क्र.४९ दि.२८/०८/२०१७ अन्वये महापालिका क्षेत्रातील खणभाग सांगली येथील सि.स.नं.१७२३ मधील जागा भूसंपादन करणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय,मुंबई यांचेकडील क्र.टिपीएस.-२०१७/VIP/१३६/प्र.क्र.११८/१७/नवि.-१३ दि.१२/०९/२०१७ अन्वये दिले निदेशानुसार महापालिकेच्या खणभाग सांगली येथील सि.स.नं.१७२९ या जागेमध्ये दक्षिण-उत्तर १५.०० मीटर रुंदीचा विकास योजना रस्ता नियोजित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदींस अनुसरुन फेरबदलाच सूचना आम जनतेच्या सूचना/हरकती मागविणेसाठी या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत प्रसिद्ध करणेस व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) मध्ये विहित केलेली सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करणेस व उक्त फेरबदल प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करणेस उक्त निदेशाद्वारे कळविणेत आलेले आहे त्यास ही सभा मान्यता दर्शवित आहे.

सूचक :- (signature)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक (signature)

(signature)
महापौर.

सहा-संचालक (नगररचना)

(signature)
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७
..०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ८२

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील शामनगर,अष्टविनायक नगर,शाहूनगर या परिसरात बाजाराची सोय नसल्याने, मल्हारराव होळकर चौक शामनगर येथील शांतीनगरकडे जाणाऱ्या ८० फुटी डी.पी.रस्त्यावर आठवडा बाजार प्रत्येक रविवारी सुरु करणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

आरोग्याधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४**

दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ८३

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका मिरज शहरातील वॉर्ड क्र.२६ मधील पिरनालसाब चौक येथे आयलॅंड आहे त्यामध्ये तेथील नागरीक केरकचरा टाकत आहेत तसेच, पावसाचे पाणी साचून दुर्गंधी पसरलेली आहे व आयलॅंड येथे नागरिक वाहन लावून रस्त्यावर वाहतुकीस अडथळा करीत आहेत. यासाठी सदरचे आयलॅंड तात्काळ हटविणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- सौ. वं. स. कदम.

अनुमोदक :- (सौ. दुरेखा कोबडे)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ८४

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्रं.१६ मधील माता रमाई आंबेडकर उद्याना समोरील (सि.स.नं.२६७/१+२ब) चौकास क्रांतिवीर डॉ.नागनाथ आण्णा नायकवडी असे नामकरण करणेस तसेच, मनपा किंवा खाजगी संस्था/व्यक्ती यांच्या माध्यमातून चौकाचे सुशोभिकरण करणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :- सौ. सुरेखा कांबळे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ८५

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.पै.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवुन ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.३८ मधील संघर्ष व्यायाम मंडळ मागील आणि वसंतदादा क्रिडा मंडळ येथील असलेले जुने शौचालय नादुरुस्त व विनावापर बंद असल्याने परिसरात दुर्गंधी परसत आहे. त्यामुळे सदर दोन्ही ठिकाणचे शौचालय पाडणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :- सौ.सुरेखा कांबळे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

पीठासीन अधिकारी

महापालिका सचिव.
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ८६

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.युवराज शिवाजीराव गायकवाड यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ४ करीता दोन शाखा अभियंता व सार्व.बांधकाम मुख्यालयासाठी दोन शाखा अभियंता मानधनावर घेणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार महानगरपालिकेमधील बहुतांश कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झालेले आहेत. कर्मचारी संख्या अत्यंत अपुरी असल्याने, महापालिकेच्या दैनंदिन कामामध्ये अडचणी येत असून, कामाचा निपटारा वेळच्या वेळी होत नाही. त्यामध्ये अभियंतांची कमतरता जास्त असल्याने, महापालिका क्षेत्रातील विकास कामे व इतर कामांची अंदाजपत्रके व अनुशंगिक कामे पुर्ण होत नसल्याने दैनंदिन कामाचा खोळंबा होत आहे. गुंठेवारी विभागाकडे देखील अभियंता नसल्याने, बरीच प्रकरणे प्रलंबित आहेत. प्रमाणपत्र पुर्ततेसाठी अभियंतांची गरज आहे. याकरीता महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम नगररचना व पाणी पुरवठा विभागाकरीता एकूण १० अभियंते मानधनावर नियुक्त करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यासाठी आवश्यकती कार्यवाही प्रशासनाने तात्काळ करावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- [स्वाक्षरी]

ठराव सर्वानुमते मंजुर

[स्वाक्षरी]

महापौर

अनुमोदक :- सौ. वं. स. कदम.

सहा. संचालक (नगररचना)

[स्वाक्षरी]

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ८७

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड-१(ज) अन्वये मा.युवराज शिवाजीराव गायकवाड यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या मालमत्ता कराच्या (घरपट्टी) बिलामध्ये वार्षिक पाणी बिलाची र.रु.२०००/- प्रमाणे आकारणी करुन वर्षातून दोन वेळा एकत्रित बिल वाटप करुन व पाणी पुरवठा व मालमत्ता कर (घरपट्टी) ची स्वतंत्र कर्मचाऱ्यांची पथके नेमूण वसुली करणेची पद्धत राबविणेकामी विचारार्थ व निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रामध्ये खाजगी नळ कनेक्शन धारकांकडून घरगुती वापराकरीता पाणी आकार म्हणून सद्या सरासरी मासिक रु.१६०/- याप्रमाणे पाणी बिलाची आकारणी करणेत येत असून, सदर बिलाची आकारणी दोन महिन्यातून एकदा होते व त्याची बिले देणेची पद्धत सुरु आहे. तसेच, मालमत्ता कराची बिले वर्षातून एकदा देणेत येत असतात. सद्या महापालिकेच्या घरपट्टी व पाणी पट्टी विभागाकडे अपुरा कर्मचारी वर्ग असलेने वसुलीसाठी दिरंगाई होत आहे. याकरीता घरगुती पाणी वापराच्या नळ कनेक्शन धारकाकडन वार्षिक पाणी बिल आकारणी म्हणून रु.२०००/- प्रमाणे आकारणी करुन, ती घरपट्टी बिलातून आकारणी करुन घरपट्टीची बिले देखील वर्षातून दोन वेळ आकारणेस ही सभा मान्यता देत असून, त्यासाठी आवश्यकती कार्यवाही प्रशासनाने ठेवणेस व त्याची अंमलबजावणी तात्काळ करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक : [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा

अनुमोदक :- सौ. वं. स. कदम.

[signature]
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ११

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमार्तील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.शिवाजी बाबूराव दुर्वे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज वॉर्ड क्र.१२ मंगळवार पेठ परिट गल्ली येथील धोकादायक शौचालय पाडणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक (सौ. सुरेखा कांबळे)

अनुमोदक शिवाजी दुर्वे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ | दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ८९

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.सुरेश देवाप्पा आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका मिरज शहरातील वॉर्ड क्र.९ येथील जिजामाता गोसावी गल्ली येथील धोकादायक शौचालय पाडणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने आवश्यकती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :

अनुमोदक
(डॉ. सुरेखा कांबळे)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०६/१०/२०१७
०९/१०/२०१७

ठराव क्रमांक :- ९०

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील गुंठेवारी परिसरातील नागरीकांचे कडून नियमितीकरण करणेसाठीचे प्रस्ताव दाखल झालेले असून, तीनही शहरातील निम्म्यापेक्षा जास्त क्षेत्रातील गुंठेवारी भागातील नागरीकांनी गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्र प्रस्ताव सादर केले नाहीत. सद्या गुंठेवारी नियमितीकरणासाठी प्रस्ताव सादर करण्याची मुदत संपली असल्याने, नागरीकांची गैरसोय होत असल्यामुळे मुदत वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी गुंठेवारी नियमितीकरण करणेसाठी दि.३१ मार्च २०१८ पर्यत मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सहा. लेखाध्य (नगररचना)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका